लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP

सांज दैनिक : मंगळवार - ४ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - ९८
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
संपादक: अशोक चिंचोले
epaper.dainikbhukamp.com







## संपादकीय......

### जनतेला घाबरवू नका

प्रिंट मीडिया होता तोपर्यंत एखादी घटना विशेषतः राजकीय घडली कि त्याचे पडसाद उमटायला किमान बारा तासाचा वेळ जात होता. पण आज इलेक्ट्रॉनिक व सोशल मीडियाचा प्रभाव एवढा झाला आहे कि, राजकारणातील 'वादा'ची मशाल कधी विझतच नाही. विधान केले, मत मांडले कि इलेक्ट्रॉनिक माध्यमं अगदी दुसऱ्या मिनिटाला समोरच्याची मतं घेऊन प्रकरण सतत तेवत ठेवण्याचे कर्तव्य पार पाडत असतात. महाराष्ट्रात या विधानसभा कालावधीत राजकीय पक्षात कमालीचे 'मतभेद' निर्माण होत आहेत. नव्हे, सदर विधानसभा कार्यकाळात पक्षीय राजकारणाचा 'टेंबा' सतत भडकत आहे. २०१९ च्या निवडणुका झाल्या त्यावेळी भाजपाशी युती करून लढणाऱ्या पक्षातील शिवसेनेने थेट काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करून महाविकास आघाडीचे सरकार बनविले. त्यावेळी बारामतीच्या जादूगाराची प्रचंड चर्चा झाली, असे प्रयोग तेच करू शकतात असा बोलबाला झाला. त्यानंतर धाकले बारामतीकर नाराज झाले. त्यांनी 'पहाटे' भाजपासोबत हात मिळवणी करून उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. तो डाव काही तासातच विस्कटला, पुन्हा तीन पक्षाचे सरकार स्थापन झाले. आश्चर्य म्हणजे अजितदादा पवार यांनी पुन्हा महाविकास आघाडीकडून उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. गेल्या वर्षी अचानक राजकीय चक्रीवादळ आलं, ते गोहाटीपर्यंत गेलं, सुरतला जाऊन स्थिरावलं, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री, फडणवीस उपमुख्यमंत्री बनले. जेमतेम वर्ष होताच परवा दुपारीच राज्यात राजकीय चक्रीवादळ निर्माण झालं, राज्यात दोन चाकावर सरकार चालू असताना अजितदादांच्या पाठिंब्याने तिसरे चाक जोडले गेले. आता यांचेही तिनचाकी सरकार चालू झाले. त्यानंतर टि. व्ही. लावता पत्रकार परिषदांवर परिषदा चालू झाल्या आहेत. गेली वर्षभर तू खरा कि मी? हे ऐकत आलो, कोण खरा हे अद्याप स्पष्ट झाले नाही. तोच राष्ट्रवादीत फूट पडली. आता राष्ट्रवादीतील दोन गटामध्ये 'प्रेस वॉर' चालू आहे. आमचा अध्यक्ष आमचा प्रतोद खरा, पक्षाची घटना, पक्ष, चिन्ह आमच्या बाजूने आहे. शरद पवार गटास आमचेवर कारवाई करण्याचा अधिकार नाही, म्हणताच दुसऱ्या गटाकडून ते सर्व खोटे आहे. आम्ही म्हणतो ते खरे आहे असे दावे-प्रतिदावे केले जात आहेत. आम्ही विधानसभा अध्यक्षाकडे बाजू मांडली आहे. आमचेच खरे होणार असे म्हटले जात आहे. यात यांचे वर्ष-दीड वर्ष सहज निघून जाईल. कोणाला किती अधिकार आहेत, कोणाचा पक्ष खरा आहे, कोणाची बाजू घटनेला धरून आहे, कोणाचा पक्षावर कब्जा आहे. हे पत्रकार परिषदा घेऊन सांगण्याचा सपाटा लावण्यात येत आहे. या गदारोळात माध्यमांना अक्षरशा मिनीटभरही उसंत नाही. सर्वात आधीच्या स्पर्धेमुळे टी. व्ही. ने काने किट्ट झाली आहेत. कोण जाणे आमच्या पुरोगामी महाराष्ट्राला कोणाची नजर लागली समजत नाही. देशाच्या राजकारणाला दिशा देणाऱ्या महाराष्ट्रात आज आपण काहितरी विपरित अनुभवतो आहोत. एकाचा पायपोस एकाला नाही. राजकारणी एकमेकांच्या अस्तित्वासाठी, सत्तेसाठी लढत आहेत आणि तिकडे जनता संकटाच्या खाईत होरपळत आहे. एखाद गावातील अपवाद वगळला तर सद्याच्या राजकारणात घडणाऱ्या घडामोडीचे कोणीही स्वागत करित नाही. सद्या राजकारणात जे चाललं आहे ते जनतेला आवडत नाही. मतरूपी 'बाण' मतदाराच्या हातून निसटला आहे. ती संधी आता पाच वर्षातून एकदाच येते, पण मागच्या निवडणुकीत मताचा जो बाण मारला त्याचा पश्चाताप करण्याशिवाय मतदारांच्या देखील हातामध्ये काही नाही. हा खरा कि तो खरा हा दोष मतदाराचा नाही. निवडणूक काळात तुम्ही भाषणे केली, आश्वासने दिली, जाहिरनामे प्रसिद्ध केले. नेत्याचे फोटो लावून मते मागितली. मतदारांनी विश्वास ठेवला. मतदानाचा हक्क बजावला, पण आजच्या राजकारणात थोरामोठ्यांची, महापुरूषांचे, नेत्यांचे निवडून येण्यासाठी फोटो पाहिजेत, पण नेते नको आहेत. निवडून आल्यानंतर राजकारण्यांना सत्ता आपल्या मुठीत पाहिजे, पण एकदा निवडून गेले कि लोकप्रतिनिधी मतदाराच्या मुठीत राहत नाहीत. आताच्या राजकारण्यातील रूसवे-फुगवे, नाराजी, हेवेदावे, बंडखोरी, मानपान, फाटाफूट, आरोप-प्रत्यारोप, उणे-दुणे या शिवाय राज्यात दुसरे काही चालूच नाही अशी स्थिती दिसत आहे. पहाटे प्रेस, दुपारी प्रेस, रात्री बारा वाजता प्रेस आणि २४X७ दिवस राजकारणातल्या भयावह बातम्या पाहून जनता अक्षरशा घाबरत आहे. हि भयानस्थिती कधी सुधारणार? कधी आम्हाला न भिता बातम्या पाहायला, वाचायला मिळणार या चिंतेत जनता आहे. काही चॅनलच्या खाली अधून-मधून एक पट्टी सतत सरकत असते. त्यात 'आम्ही कोणाला घाबरत नाही, कोणाला घाबरवत नाही' असा मचकूर असतो. राजकारण्यांनीही आपल्या वर्तनाने मायबाप जनता घाबरणार नाही असेच वर्तन करावे, एवढीच अपेक्षा.

# कंटेनर हॉटेलमध्ये घुसले
# १२ जण जागीच ठार



धुळे : समृद्धी महामार्गावर बुलढाण्यातील पिंपळखुटा येथे घडलेल्या अपघाताच्या घटनेत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला. ही भीषण अपघाताची घटना ताजी असतानाच आता पुन्हा एकदा एक भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात १२ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. धुळे - मुंबई - आग्रा महामार्गावर पळासनेर गावाजवळ भीषण अपघात झाला असल्याची माहिती समोर आली आहे. ब्रेक फेल होऊन कंटेनर एका हॉटेलमध्ये शिरल्यामुळे भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात पंधरा ते वीसजण जखमी झाले आहेत. मृतांची संख्या आणखी वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, धुळे-मुंबई-आग्रा महामार्गावर शिरपूर तालुक्यातील पळासनेर हे गाव आहे. हे गाव मध्य प्रदेशच्या सीमेवर आहे. या गावाजवळ आज (ता. ०४ जुलै) दुपारी साधारणतः १२ वाजताच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. एक कंटेनर महामार्गावरुन जात असताना त्याचा अचानक ब्रेक फेल झाला. ज्यानंतर हा कंटेनर थेट हॉटेलमध्ये शिरला. यावेळी हॉटेलमध्ये काही लोक होते. ज्यामध्ये १२ जणांचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. तर १५ ते २० जण या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. सध्या अपघातस्थळी मदतकार्य सुरू असून जखमींना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

या घटनेमुळे हॉटेल पूर्णतः उद्धस्त झाले आहे. हॉटेलसमोर काही वाहने देखील उभी होती. त्या वाहनांचे देखील या अपघातात मोठे नुकसान झाले आहे. ज्या वाहनांचे या अपघातात नुकसान झाले आहे, त्यात कोणी होते का? हे पोलिसांकडून तपासले जात आहे. अपघातस्थळी हॉटेल पूर्णतः उद्धस्त झाल्याने या ठिकाणी मातीचा ढिगारा बनला आहे. या ढिगाऱ्याखाली देखील काही लोक अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

घटनेच्या काही वेळातच अपघातस्थळी पोलिसांच्या पथकाने धाव घेऊन मदतकार्याला सुरुवात केली आह. तसेच आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्याला सुरुवात केल्याचे सांगण्यात येत आहे. हा अपघात इतका भीषण आहे की घटनास्थळी हृदय हेलावणारी परिस्थिती असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.



## स्वेच्छा निवृत्तीनंतर केंद्रेकरांनी गाठले पायी घर

संभाजीनगर : भारतीय प्रशासन सेवेतील धडाकेबाज आय.ए.एस अधिकारी अशी ओळख असणारे छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी सोमवारी स्वेच्छा निवृत्ती घेतली. ती सुध्दा अगदी साधेपणाने...ना निरोप समारंभ,ना हार-तुरे,ना फोटो.

जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पांडेय यांच्याकडे विभागीय आयुक्त पदाचा कारभार सोपवून केंद्रेकर यांनी कोणत्याही शासकीय वाहनाचा वापर न करता सपत्नीक पायी-पायीच निवासस्थान गाठले.*तेव्हा छत्रपती संभाजीनगर वासीयांनी केंद्रेकर यांना सलाम ठोकला.

आयुक्त केंद्रेकर हे सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालयात दाखल झाले. काही फाईल्सचा निपटारा केला. अभ्यागतांची निवेदने स्विकारली, अर्जसुध्दा स्विकारले. त्यानंतर दुपारी पावणे बाराच्या सुमारास जिल्हाधिकारी पांडेय यांच्याकडे विभागीय आयुक्त पदाचा पदभार सुपूर्त केला. त्यावेळी केंद्रेकर यांच्या पत्नी सौ. धनश्री केंद्रेकर या कार्यालयात दाखल झाल्या. तेव्हा जिल्हाधिकारी पांडेय यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकार्यांनी केंद्रेकर दाम्पत्याचा फोटो आपल्या मोबाईच्या कॅमेर्यात कैद केला. सुनील केंद्रेकर हे लगेचच दालनातून बाहेर पडले. महसूल व पोलिस प्रशासनाच्या काही कर्मचार्यांनी पुढे येवून शेकहॅन्ड केला, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यावेळी काहींचे डोळे अक्षरशः पाणावले होते. केंद्रेकर हे सर्वांच्या शुभेच्छांचा स्विकार करीत शासकीय वाहनाकडे वळण्याऐवजी पत्नीसह पायी-पायीच विभागीय आयुक्त कार्यालयाच्या बाहेर पडले. तेव्हा जिल्हाधिकारी पांडेय,जिल्हा पोलिस अधिक्षक मनिष कलवानिया यांच्यासह अप्पर विभागीय आयुक्त अविनाश पाठक, उपायुक्त पराग सोमन, जगदीश मणियार, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारीसुध्दा त्यांच्या पाठीमागे पायीच निघाले. केंद्रेकर दाम्पत्यास शासकीय वाहनाने जावूया अशी विनंती अधिकार्यांनी केली खरी, परंतु 'वाहन नको, पायीच बरं' असे म्हणत केंद्रेकर दाम्पत्याने पायीच निवासस्थान गाठले. केंद्रेकरांसह अन्य वरिष्ठ अधिकारी रस्त्याने पायी जात असल्याचे पाहून नागरीकांनी तातडीने केंद्रेकर यांना शेकहॅन्ड करीत शुभेच्छा देण्याकरीता भाऊगर्दी केली. तसेच आतापर्यंत केलेल्या कार्यास सलाम ठोकला. तुमचा आम्हास अभिमान आहे, अशी प्रतिक्रियाही काही नागरीकांनी व्यक्त केली.

दरम्यान, मराठवाडा विभागाचे विभागीय आयुक्त केंद्रेकर यांनी राज्य सरकारकडे गेल्या महिन्यात स्वेच्छा निवृत्तीसंदर्भात अर्ज केला होता. मात्र, त्यांच्या या निर्णयावर न्यायालयाने केंद्रेकर यांचा स्वेच्छानिवृत्तीसाठी दिलेला अर्ज सरकारने स्वीकारू नये, असा आदेश दिला होता. मार्च २०२४ पर्यंत स्वेच्छानिवृत्तीसाठी दिलेला अर्ज स्वीकारू नये, असे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे स्पष्ट आदेश होते. छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी नेमलेल्या समितीवर केंद्रेकर यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे मार्च २०२४ पर्यंत ही योजना अंतिम टप्प्यात आली असेल, तोपर्यंत तो अर्ज स्वीकारू, नये असे खंडपीठाने म्हटले होते. या पार्श्वभूमीवर सुध्दा केंद्रेकर यांचा स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज सामान्य प्रशासन विभागाद्वारे मंजूर केला. त्याप्रमाणे केंद्रेकर यांनी सोमवार ३ जूलै रोजी रितसर सेवानिवृत्ती घेतली.

### उसने दिलेले पैसे मागताच

## धारदार शस्त्र पोटात खुपसून एकाचा खून दुसऱ्या तरूणाच्या खुनाचा प्रयत्न

**लातूर : लातूर शहरातील तावरजा कॉलनी कोयना नगर परिसरात काल रात्री उसने दिलेले पैसे मागितल्याचा राग मनात धरून धारदार शस्त्र पोटात खुपसून एकाचा खून करण्यात आला तर दुसऱ्या व्यक्तीच्या बरगडीत शस्त्र खुपसून त्याच्याही खुनाचा प्रयत्न करण्यात आला. याबाबत गांधी चौक पोलिसांत एका तरूणाच्या विरोधात भादंवि ३०२, ३०७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

काल रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास रेफ्रिजेटर दुकानासमोर तावरजा कॉलनी कोयना पावर हाऊस लातूर जवळ महेश वसंत गुंड रा. तावरजा कॉलनी याने धर्मराज लांडगे रा. बस्तापुरे नगर लातूर यास काही दिवसापूर्वी उसने दिलेले ४० हजार रूपये मागितले. तेंव्हा गुंड याच्यासोबत असलेला त्याचा मित्र राजू हलगुंडे रा. सम्राट चौक लातूर याने किती दिवस पैसे ठेवायचे, पैसे परत दे असे म्हटले तेंव्हा धर्मराज लांडगे याने तू कोण मला सांगणारा असे म्हणत स्वत:जवळील धारदार शस्त्र काढले व ते शस्त्र राजू हलगुंडे याच्या पोटात खुपसले. यावेळी त्याचा मृत्यू झाला. हे दृश्य पाहून महेश वसंत गुंड याने लांडगे यास विरोध करताच त्याने महेश गुंड याच्याही पोटात धारदार शस्त्र खुपसून त्याच्या खुनाचा प्रयत्न केला. या प्रकरणी लातूरच्या गांधी चौक पोलिसांत महेश वसंत गुंड याच्या फिर्यादीवरून धर्मराज लांडगे रा. बस्तापुरे नगर याच्या विरोधात भादंवि ३०२, ३०७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक कोल्हे हे या प्रकरणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करत आहेत.

## जमीन, प्लॉट गहाण ठेऊन उस्मानाबाद बँकेची फसवणूक

लातूर : उस्मानाबाद जनता सहकारी बँक शाखा गंजगोलाई लातूर येथे लातूर शहरातील एक प्लॉट व औसा येथील दोन एकर जमीन गहाण ठेऊन देखील त्याची परस्पर विक्री केल्या प्रकरणी चौघा जणांविरूद्ध वेगवेगळे दोन गुन्हे दाखल करणयत आले आहेत.


लातूर मनपा हद्दीतील एक प्लॉट बँकेकडे गहाण ठेऊन पंधरा लाखाचे कर्ज उचलले, असे असतानाही बँकेची एनओसी न घेता तो प्लॉट दुसऱ्या व्यक्तीस विकला म्हणून या प्रकरणी प्लॉट गहाण ठेवणारा जिकरभाई कासमभाई बाटविया रा. भूसार लाईन, लातूर व प्लॉट घेणारा इरफान सलीम शेख रा. लातूर या दोघांविरूद्ध गांधी चौक पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच बँक शाखेत सूरज कमलाकर सुरवसे रा. मोरे गल्ली औसा याने औसा शिवारातील गट नं. २०८ मधील ८२ आर जमीन गहाण ठेऊन साडेतीन लाख रूपये कर्ज काढले व बँकेला अंधारात ठेऊन त्या जमिनीची परस्पर विक्री केल्या प्रकरणी सुरज कमलाकर सुरवसे रा. मोरे गल्ली औसा व शेख शहाबुद्दीन अमीन रा. गुबाळ ता. औसा यांच्या विरोधात गांधी चौक पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणी उस्मानाबाद जनता बँक शाखा गंजगोलाई लातूरचे शाखाधिकारी महादेव बाबुराव गिरी हे फिर्यादी आहेत. सदर गुन्हे गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत.

## सतीश शिवणे यांचे निधन

लातूर : उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात न. प. प्रशासन विभागातील जिल्हा प्रशासन अधिकारी या पदावर कार्यरत असलेले सतीश शिवणे यांचे आज सकाळी निधन झाले आहे.

सतीश शिवणे यांच्या पार्थिवावर आज दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास लातूर येथील मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रशासन, न. प. प्रशासन, जिल्हाभरातील नगर परिषद, नगर पंचायत, लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी, मित्र परिवार, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी प्रशासनाच्या वतीने यावेळी सतीश शिवणे यांना श्रद्धांजली अर्पण केली.



प्रशासनातील बारकावे जाणणारा अनुभवी असा हा अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने प्रशासनात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सतीश शिवणे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे. सतीश शिवणे यांच्या निधनाने शिवणे परिवारावर कोसळलेल्या दुःखात दै. भूकंप परिवार सहभागी आहे.

## राज्यात ग्रीन हायड्रोजन धोरण जाहीर

मुंबई : प्रदूषणविरहित, स्वस्त आणि मोठा ऊर्जेचा स्त्रोत असलेल्या हायड्रोजनचे उत्पादन वाढवण्यासाठी राज्याने आज एक पाऊल पुढे टाकलं आहे. आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत राज्याचे ग्रीन हायड्रोजन धोरण जाहीर करण्यात आले आहे. ग्रीन हायड्रोजन धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले

येणाऱ्या काही वर्षात जगभरात ग्रीन हायड्रोजनवर अनेक देशांचा भर आहे. त्यामुळे सर्व देशांकडून मोठी गुंतवणूक होणार आहे. मोठ्या प्रमाणात असलेल्या हायड्रोजनच्या किंमती कमी होण्यास देखील यामुळे मदत होईल. आज हायड्रोजन २५० रुपये प्रति किलो आहे. जरमोठी गुंतवणूक झाल्यास २०३५ सालापर्यंत हायड्रोजनच्या किंमती प्रति किलो रुपये ७०-८० पर्यंत खाली येणार तर २०५० सालापर्यंत ५० रुपयांहून कमी किंमतीत हे इंधन उपलब्ध होऊ शकेल. ग्रीन हायड्रोजनच्या उत्पादनासाठी पाण्यापासून हायड्रोजन आणि ऑक्सिजन वेगवेगळे केले जाते. आणि ह्या प्रक्रियेला विद्युतविघटन (इलेक्ट्रोलिसिस) म्हणतात. या प्रक्रियेत इलेक्ट्रोलायजरचा वापर करण्यात येतो. यावेळी मराठा, कुणबी विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड सारथी शिष्यवृत्ती योजना दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना देण्यासोबत इतर विषयांवरही निर्णय घेण्यात आले.

## आई-वडील बाजाराला जाताच मुलीस फूस लावून पळविले

रेणापूर : आई व वडील खरोळाच्या आठवडी बाजारास जाताच गावातील एका तरूणीने घरात एकटी असलेल्या अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविल्याचा प्रकार कुंभारवाडी ता. रेणापूर येथे घडला आहे.

कुंभारवाडी येथील एक दाम्पत्य आठवडी बाजारासाठी म्हणून २१ जून रोजी खरोळा येथील आठवडी बाजारास गेले होते. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास ते घरी परत आले तेंव्हा घरात असलेली १७ वर्षे, ७ महिन्याची मुलगी गायब असल्याचे निदर्शनास आले. तीस गावातील एका तरूणीने फूस लावून पळवून नेल्याचे मुलीच्या वडिलांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस तपास चालू आहे.


### नावात बदल

मी अरूणा ललीतकुमार शह असे जाहिर निवेदन करते की, माझ्या पासपोर्टवर माझ्या नावापुढे माझ्या पतीच्या नावाचे स्पेलींग असे आहे. **SHAH ARUNA LALIT** ते मी बदलून माझ्या सर्व कागदपत्रावर माझ्या पतीचे नाव **SHAH ARUNA LALITKUMAR** असे केले आहे. तरी यापुढे मात्र **SHAH ARUNA LALITKUMAR** या नावाने ओळखण्यात यावे व माझ्या पासपोर्टवर पण माझे नाव **SHAH ARUNA LALITKUMAR** हेच राहिल.

**NEW NAME : SHAH ARUNA LALITKUMAR**
**OLD NAME : SHAH ARUNA LALIT**
**ADDRESS : Chandra Nagar, Latur.**

## फडणवीस किंवा पवार होऊ शकतात मुख्यमंत्री, जाणून घ्या का अडचणीत येऊ शकतात एकनाथ शिंदे?

महाराष्ट्रातील राजकारणाला नवे वळण लागले आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर राष्ट्रवादीतील बंडखोरीमुळे सत्तासंघर्षाचा दुसरा मुद्दा समोर आला आहे. लवकरच त्याचा तिसरा अंकही पाहायला मिळेल, अशी अटकळ बांधली जात आहे. हे प्रकरण शिवसेनेच्या (शिंदे गट) १६ आमदारांच्या अपात्रतेशी संबंधित आहे. हा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भवितव्य ठरवणार आहे. त्यामुळे राज्यात देवेंद्र फडणवीस की अजित पवार मुख्यमंत्री




होणार, अशी चर्चा सुरू झाली आहे.

खरे तर, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने मे महिन्यात शिवसेनेच्या (उद्धव गटाच्या) याचिकेवर निकाल देताना महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांना १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत लवकरच निकाल देण्याचे निर्देश दिले होते. हा निर्णय येऊन जवळपास दोन महिने उलटले आहेत. ज्या आमदारांवर अपात्रतेची टांगती तलवार आहे, त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही नाव आहे. यावर सभापतींनी ११ ऑगस्टपर्यंत निर्णय घ्यायचा आहे.

अजित पवार यांना मुख्यमंत्री करण्याच्या अटीवर शिंदे सरकारमध्ये सामील झाल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. त्याचवेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत म्हणाले की, अजित पवार मंत्रिमंडळात गेल्यानंतर राज्यातील राजकीय परिस्थिती बदलली आहे. शिंदे हे अवघे काही दिवस मुख्यमंत्री आहेत. दुसरीकडे, अटकळांच्या दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अजित पवार विकासाला पाठिंबा देत आहेत आणि पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली विकास होत आहे. हा विकासाचा अजेंडा आम्ही पुढे नेऊ.

## ऑनलाईन खरेदीत मिळाले चुकीचे सामान, तर अशा प्रकारे होईल भरपाई

तुम्ही अनेकदा ऑनलाइन शॉपिंग करता आणि सवलतीत नवीन वस्तू ऑर्डर करून तुमचा वेळ वाचवता. पण अनेक वेळा तुम्ही वस्तू मागवता, पण जेव्हा तुम्हाला त्याची डिलिव्हरी मिळते, तेव्हा तुम्हाला धक्का बसतो. अनेक वेळा फोनच्या जागी साबणाची वडी आढळते. अशा परिस्थितीत, चुकीची ऑर्डर मिळाल्यावर तुमची घाबरगुंडी उडते आणि इकडे तिकडे शोधून, त्या उत्पादनाची तक्रार करता किंवा त्या प्रमाणात खराब रेटिंग देता. पण आम्ही तुम्हाला सांगतो की तुमच्या या सर्व कामांनी काहीही होणार नाही, तुमचे उत्पादन असे परत मिळणार नाही आणि तुमचे पैसेही वाया जातील.

जर एखादी छोटी वस्तू असेल, तर तुम्ही त्याकडे दुर्लक्ष देखील करू शकता, परंतु जर ती वस्तू मौल्यवान असेल आणि तुम्हाला परतावा हवा असेल, तर तुम्हाला ही प्रक्रिया अवलंबावी लागेल.

जर तुम्हाला चुकीचे किंवा रिकामे पार्सल वितरित केले गेले असेल, तर तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही, फक्त तुमच्याकडे आलेले चुकीचे उत्पादन परत करा. यासाठी, तुम्ही जिथून ऑनलाइन खरेदी केली आहे, तिथून ऑर्डर तपशीलावर जा. तुम्ही ऑर्डर तपशीलावर जाता तेव्हा सर्व काही तुम्हाला दाखवले जाते. ऑर्डरच्या तपशीलामध्ये,




तुम्हाला रिटर्न आयटम पर्याय निवडावा लागेल आणि उत्पादन परत करावे लागेल.

परंतु अनेक वेळा असे घडते की तुमच्याकडे उत्पादन परत करण्याचा पर्याय नसतो, परंतु तुम्हाला उत्पादन परत करायचे असेल, तर त्यासाठी तुम्हाला अधिकृत पेजवर जावे लागेल आणि ग्राहक मदत विभागात तुमची तक्रार नोंदवावी लागेल. तुमच्या ऑर्डरचे तपशील आणि तुम्हाला जे उत्पादन दिले गेले त्याच्या फोटोसह आपल्यासोबत काय झाले आहे याचा तपशील मेल करावा लागेल आणि तोच मेल तुम्हाला देखील पाठवून ठेवावा लागेल.

ऑर्डर करताना लक्षात ठेवा, चुकीचे पार्सल आले तरी राहणार नाही टेन्शन

अधिकृत आणि सत्यापित वेबसाइटवरून खरेदी करा: लोकप्रिय आणि विश्र्वसनीय ऑनलाइन विक्रेत्यांकडून खरेदी करा.

या व्यतिरिक्त, खाली दिलेल्या कोणत्याही उत्पादनाबद्दल ग्राहकांचे पुनरावलोकन आणि फीडबॅक तपासा. हे तुम्हाला उत्पादन कसे बाहेर वळते याची कल्पना देते.

वेबसाइटवरील कनेक्शन सुरक्षित असल्याचे तपासा. तुम्हाला अॅड्रेस बारमध्ये पॅडलॉक चिन्ह दिसल्यास आणि वेबसाइट URL http:// ऐवजी https:// ने सुरू होत असल्यास अशा डीलपासून दूर रहा.

कोणतीही ऑर्डर देताना नेहमी रिटर्नचा पर्याय तपासा आणि तुम्हाला किती दिवसात उत्पादन परत करावे लागेल, हे देखील तपासा. साधारणपणे प्रत्येक उत्पादनाच्या परताव्याची वेळ वेगळी असते.

फक्त णझख किंवा कार्डने पेमेंट करा, याशिवाय, इतर कोणत्याही लिंक किंवा इतर अॅपद्वारे पैसे देऊ नका. तुम्ही णझख किंवा कार्डने पैसे भरल्यास, जेव्हा पैसे तुम्हाला परत केले जातात, तेव्हा ते थेट तुमच्या खात्यात येतात. वेबसाइटवर फसवणूकीचा अहवाल द्या आणि पुनरावलोकन किंवा अभिप्राय जोडणे आवश्यक आहे.

याशिवाय पार्सल उघडताना नेहमी व्हिडिओ बनवा. यासह, जर तुमचे पार्सल खराब झाले असेल किंवा चुकीच्या पद्धतीने वितरित केले असेल, तर तुमच्याकडे पुरावा असेल.

## गोगलगाय अंडी टाकण्याचा महिना धोका टाळता येऊ शकतो!!

जुलै महिन्याचा दुसरा पंधरवाडा गोगलगायीद्वारे अंडी टाकण्याचा राहणार असल्यामुळे जुलै महिन्याचा पहिला पंधरवाडा गोगलगायीच्या प्रभावी नियंत्रणासाठी निर्णायक राहणार आहे. त्यामुळे पहिल्या पंधरवाडयातच सर्व शेतकऱ्यांनी मोहीम स्वरूपात गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन करावे असे आवाहन कृषि विभाग व कृषि विद्यापीठाने केले आहे.

सर्वसाधारण गोगलगायी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात जमिनीखाली सुप्तावस्थेत जातात आणि जून महिन्यात चांगला पाऊस होताच त्या सुप्तावस्थेतून बाहेर येऊन जमिनीच्यावर येतात.

मागीलवर्षी सुप्तावस्थेत गेलेल्या गोगलगायी चालू वर्षातील जून महिन्याच्या शेवटच्या आठवडयात झालेल्या पावसानंतर सुप्तावस्था संपवून जमिनीच्या वर आलेल्या आहेत. सध्या

मागीलवर्षी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे दुबार पेरणी कराव्या लागलेल्या क्षेत्रामध्ये गोगलगायीचा प्रादुर्भाव जास्त आढळून येत आहे.

सुप्तावस्था संपवून जमिनीवर आलेल्या गोगलगायी पहिल्या पंधरा दिवसात समान आकाराच्या गोगलगायीशी संग करून पंधरा दिवसानंतर जमिनीच्याखाली प्रत्येक गोगलगाय १०० ते १५० अंडी टाकणार आहे.

या अंडयाद्वारे गोगलगायीची पुढील वर्षाची पिढी तयार होणार आहे.

त्यामुळे अंडी टाकण्याच्या अगोदर जर आपण गोगलगायीचे नियंत्रण केले तर चालू हंगामातील सोयाबीन पिकाबरोबरच पुढील वर्षातील सोयाबीन पिकाचे संरक्षण होण्यास मदत होणार आहे.

गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन

गोगलगायी सोयाबीन पिकाचे रोपावस्थेत मोठया प्रमाणात नुकसान करत असल्यामुळे रोपावस्थापूर्वीच गोगलगायीचे नियंत्रण करणे आवशयक आहे.

सध्या सुप्तावस्थेतून बाहेर आलेल्या गोगलगायी दररोज सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान बांधाच्या बाजूने आढळून येत आहेत. त्यामुळे गोगलगायीच्या प्रभावी नियंत्रणासाठी गावातील सर्व शेतकऱ्यांनी मोहीम स्वरुपात सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान



शेतात जाऊन जमिनीच्या वर आलेल्या गोगलगायी गोळा कराव्यात.

गोळा केलेल्या गोगलगायी कुठेही न टाकून देता साबणाच्या किंवा मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात किंवा गोळा केलेल्या गोगलगायीवर मिठ किंवा चुन्याची भुकटी टाकावी.

त्यासोबतच सुतळीचे बारदाने गुळाच्या पाण्यात भिजवून आदल्या दिवशी बांधाच्या बाजूने रॅन्डम पद्धतीने टाकावेत आणि दुसऱ्या दिवशी सकाळी बारदान्याखाली जमा झालेल्या गोगलगायी गोळा करून मिठाच्या अथवा साबणाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात.

याशिवाय स्नेलकिलच्या छोटया छोटया गोळया बांधाच्या बाजूने ५ ते ७ फुट अंतरावर टाकून द्याव्यात किंवा

गोगलगायीचा प्रादुर्भाव जास्त क्षेत्रावर झाला असल्यास स्नेलकिल गोळ्याचे पावडर तयार करून पाण्याच्या मदतीने पेस्ट तयार करावी आणि अशी पेस्ट मूरमुऱ्याला लावावी व असे मुरमुरे गोगलगाय प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रावर टाकावेत.

स्नेलकिल हे औषध गोगलगायीना आकर्षून घेते आणि या स्नेलकिल गोळीला किंवा स्नेलकिलयुक्त मूरमुऱ्याला खाल्यानंतर ४ ते ५ तासात गोगलगायीच्या शरीरातील स्त्राव बाहेर पडून गोगलगायी नष्ट होतात. गोगलगायी गोळा करताना हातात हातमोजे घालणे आवश्यक आहे.

**विस्तार कृषि विद्यावेत्ता**
**विभागीय कृषि विस्तार शिक्षणकेंद्र, लातूर**

## मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रमात उस्मानाबाद जिल्हा राज्यात प्रथम

उस्मानाबाद हा केंद्र सरकारच्या निती आयोगाने आकांक्षित जिल्हा जाहीर केला असून या जिल्हयाच्या दरडोई उत्पनात वाढ व्हावी यासाठी केंद्र आणि राज्य सरकार विविध योजनांमधून प्रयत्न करत आहे.जिल्हयात नव उद्योजकांची संख्या वाढावी,बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे या उद्येशाने राज्य सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम अंमलबजावणीत उस्मानाबाद जिल्हयाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात उद्दीष्ट ओलांडत राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे जिल्हयाला ६५० उद्योग निर्मीतीचे उदिष्ट दिलेले असताना प्रत्यक्षात ७०२ उद्योग जिल्हयात सुरू झाले आहेत.

उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागात याचा लाभ मोठया प्रमाणात झाला असून ५२० नवे उद्योजकांनी ७४.१ टक्के या योजनमूळे नविन उद्योग सुरू करण्यास हातभार लागला आहे.तर शहरी भागातील १८२ (२५.९ टक्के) नव उद्योजकांना याचा लाभ झाला आहे. यात प्रामुख्याने रेडीमेडगारमेंट १९५ अन्न प्रक्रिया उद्योग १८९ मल्टी सर्व्हीसेस ३५ विधूत सेवा उद्योग १५ शेती व्यवसाय ३५ फॅब्रीकेशन ३९,ब्युटीपार्लर ४१ मंगल कार्यसेवा २३ आणि इतर १४० असे सर्व मिळून ७०२ उद्योग यामुळे सुरू झाले आहेत.

जिल्हयात ४०५ महिलांना याचा लाभ झाला असून अनुसूचित जाती जमाती मधील १३६ लाभार्थ्यांना तर सर्वसाधारण प्रवर्गातील ५६६० लाभार्थी यामुळे नविन उद्योग सुरू करू शकले आहेत.जिल्हयातील ७०२ नव उद्योगजकांना सात कोटी ९२ लाख रुपयांचे नवउद्योजकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठी मदत झाली आहे. जिल्हयातल्या सर्वच बँकाशी जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिकाऱ्यांनी ठेवलेला संपर्क समन्वय आणि जिल्हा उद्योग केंद्रातील कर्मचाऱ्यांची मेहनत यामुळे हे उद्दीष्ट झाले आहे. यासोबत या मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रमाची जिल्हयात झालेली प्रसिध्दी, प्रचार, यामुळे झालेली जनजागृती यामुळे नव उद्योजक सुशिक्षित बेरोजगारांनी या योजनेच्या सहाय्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा या मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रमाचे उद्दीष्ट पूर्ण करू शकला परिणामी राज्यात सर्वप्रथम राहिला.

## व्हाईट कॉलर जॉब मिळणे अवघड, विश्वास बसत नसेल तर हे आकडे बघा

आजच्या जगात व्हाईट कॉलर नोकरी मिळणे कठीण झाले आहे. नुकताच नोकरी जॉब स्पीक इंडेक्सने अहवाल प्रसिद्ध केला आहे. ज्यामध्ये देशातील अनेक क्षेत्रात नोकरी मिळणे किती कठीण झाले आहे, हे सांगितले आहे. अहवालातील आकडेवारी अतिशय धक्कादायक आहे. अहवालानुसार, आयटी, रिटेल, बीपीओ, एज्युकेशन, एफएमजीसी सारख्या क्षेत्रांमध्ये व्हाईट कॉलर हायरिंगमध्ये घट झाली आहे.

मागील महिन्याबद्दलच बोलायचे झाले, तर केवळ जून महिन्यात व्हाईट कॉलर नोकऱ्यांमध्ये ३ टक्के घट झाली आहे. आम्ही तुम्हाला अहवालाचे संपूर्ण सत्य सांगत आहोत.

**जूनमध्ये नोकरभरतीत झाली ३ टक्क्यांनी घट**

नोकरी जॉब स्पीक्स इंडेक्सच्या आकडेवारीनुसार, या वर्षी नोकरीच्या भरतीत सर्वात मोठी घट जून महिन्यात नोंदवली गेली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या महिन्यात २७९५ नोकऱ्या कमी झाल्या आहेत. तर जून २०२२ मध्ये हा आकडा २,८७८ वर होता. व्हाईट कॉलर जॉबची सर्वाधिक चर्चा कर्मचाऱ्यांची आहे. यामध्ये पगारदार व्यावसायिकांचा समावेश आहे, जे कार्यालयात काम करतात आणि व्यवस्थापनाचा भाग आहेत. आयटी आणि मेट्रो शहरांमध्ये त्यांची संख्या सर्वाधिक आहे.

**या क्षेत्रांमध्ये झाली इतकी घसरण**

जॉब स्पीक्स इंडियाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत आयटी क्षेत्रात ३१ टक्के नोकऱ्यांमध्ये घट झाली आहे. त्याच वेळी, तेल आणि वायू क्षेत्रात ४० टक्के वाढ दिसून आली आहे. एकट्या या क्षेत्रात वर्षभरात ४० टक्के भरती झाल्या आहेत. फार्मा क्षेत्रात नोकऱ्यांमध्ये भरभराट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात १४ टक्के वाढ झाली आहे. हॉस्पिटॅलिटी आणि बँकिंग क्षेत्रातही नोकऱ्यांमध्ये वाढ दिसून आली आहे.

**या शहरांमध्ये वाढत आहेत नोकऱ्या**

गेल्या वर्षीच्या जूनच्या तुलनेत नोकरीच्या भरतीमध्ये अहमदाबाद २३ टक्क्यांनी वाढीसह अव्वल स्थानावर आहे. प्रमुख मेट्रो शहरांच्या तुलनेत अहमदाबादमध्ये सर्वाधिक नोकरभरती झाली आहे. त्यापाठोपाठ वडोदरा १४ टक्क्यांच्या वाढीसह दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर जयपूर स्थिर आहे. मुंबई वगळता, मोठ्या आयटी शहरांमध्ये नोकऱ्या कमी होत आहेत.

## कलम ३७० प्रकरणी ११ जुलै रोजी सुनावणी

नवी दिल्ली : राज्यघटनेतील कलम ३७० अंतर्गत जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा केंद्र सरकारने रद्द केला आहे. केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या २० हून अधिक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. आता यावर सुप्रीम कोर्टात ११ जुलै रोजी पाच न्यायाधीशांच्या घटनापीठापुढे सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती संजय किशन कौल, न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा या घटनापीठात समावेश आहे.

मार्च २०२० मध्ये या प्रकरणाची सुनावणी घेण्याचे ठरले होते. परंतु त्यानंतर काही याचिकाकर्त्यांनी मागणी केली होती की या याचिकांची सुनावणी सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे व्हावी, परंतु पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने या याचिका सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे न पाठवण्याचा निर्णय घेतला होता.

याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला होता की सर्वोच्च न्यायालयाचे दोन निवाडे - प्रेमनाथ कौल विरुद्ध जम्मू आणि काश्मीर राज्य आणि संपत प्रकाश विरुद्ध जम्मू आणि काश्मीर राज्य-पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिलेले कलम ३७० च्या व्याख्येशी संबंधित होते पण परस्परविरोधी होते. मात्र, या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने दोन्ही निर्णयांमध्ये कोणताही विरोधाभास नसल्याचे सांगत हा युक्तिवाद फेटाळला होता.

याचवर्षी फेब्रुवारीमध्ये सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर लवकर सुनावणीसाठी याचिकांचा उल्लेख करण्यात आला होता. खंडपीठ निश्चित झाल्यानंतर हा निर्णय आता घेण्यात आला आहे.

## उस्मानाबाद कृषी क्षेत्रातील आव्हाने व राज्य शासनाची मदत

शेती अनेक अर्थाने विकासासाठी महत्त्वाची आहे. उस्मानाबादला दीर्घ आणि समृद्ध कृषी इतिहास आहे. या प्रदेशात शतकानुशतके शेती केली जात आहे, आणि उस्मानाबादच्या लोकांनी जमीन आणि तिची क्षमता याविषयी सखोल माहिती विकसित केली आहे.स्वातंत्र्य मिळाल्यापासून, उस्मानाबादने आपल्या कृषी क्षेत्राचा विकास सुरू ठेवला आहे. शेती हा उस्मानाबादच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या प्रदेशात अनेक मोठ्या कृषी फार्म आहेत आणि उस्मानाबादचे लोक अजूनही कुशल शेतकरी आहेत. उस्मानाबाद हे बाजरी, कडधान्ये आणि तेलबियांचे प्रमुख उत्पादक आहे आणि मोठ्या प्रमाणात कापूस उत्पादनही होते. उस्मानाबादच्या जनतेने शतकानुशतके अनेक आव्हानांना तोंड दिले आहे, परंतु त्यावर मात करण्याचा मार्ग त्यांनी नेहमीच शोधला आहे. जिल्हयातील कृषी क्षेत्र हे लोकांच्या मेहनतीचा आणि चातुर्याचा पुरावा आहे.

दुष्काळ आणि आपत्तीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत.गेल्या वर्षी जून ते ऑक्टोबर मध्ये झालेल्या सततच्या पाऊस,अतिवृष्टी व गोगलगाय किडीमूळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना २९८ कोटी पेक्षा जास्त निधी वितरीत झाला आहे.सप्टेंबर- ऑक्टोबर मधील बाधित शेतकऱ्यांना पिक नुकसानीसाठी २२२ कोटी ४३ लाख निधीची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे. खरीप हंगाम २०२३ करीता एक लाख ९ हजार १७१ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले असून जिल्ह्यास ५२ हजार ८८३ मे.टन खते उपलब्ध आहेत. खरीप हंगामाकरीता बियाणे व खताची टंचाई भासणार नाही याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच जिल्हा व तालुकास्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

कृषी विकासात शेतरस्त्यांची भूमिका खूप महत्वाची आहे. शेतरस्त्यांची निकड लक्षात घेता जिल्हाधिकारी यांनी सर्व तहसीलदार यांच्या वेळोवेळी बैठका घेतल्या आहेत. गेल्या वर्षापासून जिल्ह्यातील ३८४ शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात आले आहेत. या

शेतरस्त्यांचा १२ हजार २४८ शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ४३२ किलोमीटरचे शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात शासन हमीभाव या योजनेअंतर्गत एकूण १७ खरेदी केंद्र कार्यरत आहेत. या केंद्रामार्फत ६ हजार ३७२ शेतकऱ्यांचा ११ लाख ४० हजार क्विंटल हरभरा खरेदी झालेला आहे. उस्मानाबाद जिल्हयामध्ये खरीप हंगाम २०२३ मध्ये एकुण ६,४७,३०० हेक्टर क्षेत्रावरती पेरणीचे नियोजन आहे.जिल्हयामध्ये सोयाबीन हे प्रमुख पिक असुन सन २०२३-२४ करीता ४,४६,९०० हेक्टर पेरणी क्षेत्र प्रस्तावित केले आहे. जिल्हयामध्ये वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७६०.३० मि.मि. असून माहे ऑक्टोबर २०२२ पर्यंत ८३१.१६ मि.मि. पर्जन्यमान झाले आहे.

कृषि निविष्ठा व सनियंत्रण - खरीप हंगाम २०२३ करीता १०९१७१ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले असून जिल्हयास ५२८८३ मे.टन खते जिल्हयास उपलबध आहे. खरीप हंगामाकरीता बियाणे व खताची टंचाई भासणार नाही याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच कृषि निविष्ठा सनियंत्रणांसाठी जिल्हा व तालुकास्तरावर भरारी पथकांची स्थापना कृषि विभागामार्फत करण्यात आलेली आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान - सन २०२२-२३ मध्ये एकात्मिक फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सामुहीक शेततळे ,फलोत्पादन यांत्रिकीकरण,नियंत्रित शेती,कांदाचाळ व वैयक्तीक शेततळे अस्तरीकरण व पॅकहाऊस या घटकारीता ७८८लाभार्थींना ६.१५ कोटी निधीचे वितरण आलेले आहे. व सन २०२३-२४ करीता एकात्मिक फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सामुहीक शेततळे, वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण, संरक्षित शेती, कांदाचाळ, पॅकहाऊस, प्राथमिक प्रक्रिया केंद्र इत्यादी घटकाकरीता रु.११.३२ कोटीचा आराखडा करण्यात आलेला आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (ठिबक व तुषार सिंचन ) - सन २०२२-२३ -९४७४ लाभार्थींना ७०३४.१३ हेक्टर करीता रु. १९.६७ कोटी अनुदान वितरीत करण्यात आला आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातंर्गत जिल्हयातील २८७ गावाची निवड केली आहे.सन २०२२-२३ मध्ये २६२१ अर्जदारांना रु.८.७४ कोटी रक्कमेचे अनुदान त्यांच्या बँक खातेवर डी.बी.टी. पध्दतीने जमा करण्यात आलेले आहे.

कृषि यांत्रिकीकरण उपअभियान व राज्य पुरस्कृत उपअभियान -सन २०२२-२३ करीता २४८३ लाभार्थींना रु.१५.६८ कोटीचे अनुदान वितरण करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजना :- खरीप हंगाम २०२२ मध्ये ४,९८,४३७ शेतकऱ्यांना ३४०.८३ कोटी नुकसान भरपाई मिळालेली आहे.

तसेच रब्बी हंगाम २०२२ मध्ये ४८,९८० अर्जदारांनी ३८,९६९ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे.

निती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयास कृषि व जलसंधारण कामांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबदल रु. ३.०० कोटी प्राप्त बक्षीस रक्कमेपैकी रु.१.७५ कोटी मंजुर आराखडयानुसार १७६ बीबीएफ व ७५ वैयक्तीक शेततळे अस्तरीकरणासह या घटकांचा लाभ देण्यात येणार आहे.आकांक्षित जिल्हयासाठी कृषि यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत सन २०२२-२३ करीता १४ औजारे बँक स्थापन करण्यात आले असून रु.१.१२ कोटी अनुदान लाभार्थींनी वितरण करण्यात आले आहे. जुन २०२२ पासून उस्मानाबाद जिल्ह्यात कृषी विभागामार्फत विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले.या कालावधीत कृषी विभागाने१२ हजार ६४४ लाभार्थ्यांना १६९ कोटी ७ लाख ४५ हजार रक्कम अनुदान वितरीत करण्यात आला.

जिल्ह्यातील शेतकरी खातेदारांनी ई-पीक पाहणी अॅप डाऊनलोड करुन त्यास भरघोस प्रतिसाद देत ४ लाख १० हजार खातेदार शेतकऱ्यांपैकी २ लाख १० हजार शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंदणी अॅपवर केली आहे. २०२३-२४ च्या या अर्थसंकल्पात देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. केंद्र सरकार प्रमाणे प्रतिवर्षी सहा हजार रुपये नमो शेतकरी महा सन्मान निधी तसेच एक रुपयांमध्ये पीक विमा, जलयुक्त शिवार २.० ला मंजुरी, मराठवाड्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रिड ची स्थापना यासह इतर अनेक शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या फायद्याचे निर्णय या अर्थसंकल्पामध्ये घेण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून लाभ होणार आहे. कारण राज्य सरकारने शेतकऱ्यांना केंद्राच्या धर्तीवर वर्षाकाठी ६ हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील दोन लाख ७५ हजार ६८० शेतकऱ्यांना हप्त्यापोटी ५५ कोटी १३ लाख ६० हजार रुपयांची मदत होणार आहे.आधीची रक्कम एवढीच असून त्यामुळे एकूण वर्षाल रक्कम ११० कोटी २७ लाख २० हजार रुपये होईल. शेतीला दिवसा वीज पुरवठा व्हावा यासाठी वर्षाला दहा टक्के प्रमाणे सौर वाहिनी करण्याचेही निश्चित करण्यात आले आहे.

उस्मानाबादमधील कृषी क्षेत्राला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे, ज्यामध्ये हवामान बदल, पाणी टंचाई आणि कीटक यांचा समावेश आहे. तथापि, उस्मानाबादचे लोक लवचिक आहेत आणि या आव्हानांवर मात करण्यासाठी कार्यरत आहेत.

**-यासेरोद्दीन काझी**
जिल्हा माहिती अधिकारी(अ.का.), उस्मानाबाद

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## जर तुम्हाला वाढवायची असेल Metabolism गती, तर हे मसाले खा, वजन कमी होण्यास मदत होईल

वजन कमी करण्यासाठी चांगले Metabolism खूप महत्वाचे आहे. खराब जीवनशैलीमुळे लोकांचे चयापचय कमकुवत होते. जर तुम्हाला Metabolism वाढवायचा असेल तर तुम्ही तुमच्या आहारात काही मसाल्यांचाही समावेश करू शकता. हे मसाले जलद वजन कमी करण्यास देखील मदत करतील. या मसाल्यांचा समावेश तुम्ही तुमच्या आहारात अनेक प्रकारे करू शकता.


Image Credited - Healthifyme

या मसाल्यांमध्ये इतरही अनेक पोषक घटक असतात. त्यामुळे Metabolism वाढवण्यासोबतच ते आरोग्याला इतर अनेक फायदे देण्याचे काम करतात.

दालचिनी – दालचिनीमध्ये अँटी-इंफ्लेमेटरीसोबतच अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. दालचिनी खाल्ल्याने वजन लवकर कमी होण्यास मदत होईल. दालचिनी तुमची चशींरलेश्रळीा गती वाढवते. करी बनवण्यासाठी तुम्ही दालचिनी वापरू शकता.

लाल मिरची – लाल मिरचीमध्ये कॅप्सेसिन असते. त्यात थर्मोजेनिक गुणधर्म आहेत. हे तुम्हाला कॅलरी जलद बर्न करण्यास मदत करते. लाल मिरचीमुळे तुम्ही खराब कोलेस्ट्रॉल कमी करू शकता. यामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्यही चांगले राहते. लाल मिरची झपाट्याने वजन कमी करण्यास देखील मदत करते.

बडीशेप – बडीशेप थंड करणारा मसाला आहे. बडीशेपमध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि डी मुबलक प्रमाणात असते. त्यात अँटिऑक्सिडंट गुणधर्म आहेत. त्यामुळे आतडे निरोगी राहण्यास मदत होते. पचनसंस्था सुधारण्यासोबतच वजन झपाट्याने कमी होण्यासही मदत होते.

मेथी – मेथीमध्ये फायबर असते. त्यामुळे जास्त खाण्याची इच्छा कमी होते. त्यामध्ये असलेल्या फायबरमुळे तुमचे पोट भरलेले वाटते. यामुळे भूक कमी लागते. यामध्ये असलेले गुणधर्म तुम्हाला ऑक्सिडेटिव्ह तणावापासून वाचवतात. यामुळे तुमची पचनक्रिया निरोगी राहते.

वेलची – वेलचीमुळे तुम्हाला सूज आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. हे आपल्याला जलद वजन कमी करण्यास मदत करते.

काळी मिरी – मिरीमध्ये पेपेरीन असते. यामुळे तुमची चयापचय वेगाने वाढते. हे आपल्याला जलद वजन कमी करण्यास मदत करते.

हळद – हळदीमध्ये कर्क्यूमिन असते. हळदीमध्ये असलेले गुणधर्म जलद वजन कमी करण्यास मदत करतात. यामुळे तुमची पचनक्रियाही निरोगी राहते. आपण हळदीसह निरोगी पेय आणि पदार्थ तयार करू शकता.

## हृदयविकाराचा झटका आल्यास काय आहे प्रथमोपचार?

हल्ली हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढत आहे. एखाद्या सेलिब्रिटीला किंवा ओळखीच्या व्यक्तीला हृदयविकाराचा झटका आल्याची बातमी आपण दररोज ऐकत असतो. हृदयविकाराचा झटका आल्यास तत्काळ मदत मिळाल्याने पीडित व्यक्तीच्या जगण्याची शक्यता वाढते. यामध्ये प्रथमोपचार खूप उपयुक्त ठरू शकतात. हृदयविकाराचा झटका आल्यास हृदयविकाराचा झटका आला असेल, तर प्रथमोपचारात काय करावे हे जाणून घेऊया.

**हृदयविकाराच्या झटक्यादरम्यान काय होते?**

हृदयविकाराच्या झटक्यानंतर छातीत दुखणे १५ मिनिटे किंवा त्याहून अधिक काळ टिकू शकते. काही लोकांना ही वेदना सौम्य वाटते, तर काहींना तीव्र वेदना जाणवते. ही अस्वस्थता सामान्यतः लोकांना हृदयावर दाब किंवा जडपणाच्या स्वरूपात जाणवते. जरी काही लोकांना अशी कोणतीही लक्षणे जाणवत नाहीत. स्त्रियांमध्ये, उलट्या किंवा पाठदुखी यांसारख्या आणखी वेगळ्या प्रकारांमध्ये लक्षणे दिसतात.

**काय होते जेव्हा हृदयविकाराचा झटका येतो**

जेव्हा एखाद्याला हृदयविकाराचा झटका येतो, तेव्हा त्यांना सहसा छातीत दुखणे, दाब, घट्टपणा किंवा छातीच्या मध्यभागी दाबणे किंवा तीक्ष्ण वेदना होतात. वेदना आणि अस्वस्थता खांदे, हात, पाठ, मान, जबडा, दात आणि कधीकधी वरच्या ओटीपोटात पसरते. उलट्या, अपचन, छातीत जळजळ किंवा ओटीपोटात वेदना जाणवू शकतात. श्वास कोंडणे सुरू होते. घाम येणे सुरू होते आणि चक्कर येणे किंवा बेहोशी जाणवते.

**एखाद्याला हृदयविकाराचा झटका आल्यावर काय करावे**


Image Credited - Care Health Insurance

१. आपत्कालीन क्रमांकावर कॉल करा : हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे तुमच्यामध्ये किंवा इतर कोणामध्ये दिसली, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये, सर्वप्रथम इमर्जन्सी नंबरवर कॉल करून वैद्यकीय सेवा किंवा रुग्णवाहिका बोलवावी. अशी कोणतीही सुविधा नसल्यास मित्र, ओळखीच्या किंवा शेजाऱ्याच्या मदतीने ताबडतोब जवळच्या रुग्णालयात पोहोचण्याची व्यवस्था करा.

२. ॲस्पिरिन चघळणे आणि गिळणे : आपत्कालीन सेवा तुमच्यापर्यंत पोहोचेपर्यंत ॲस्पिरिन रक्त गोठण्यापासून रोखू शकते. हे हृदयविकाराच्या झटक्याचे नुकसान कमी करू शकते. तथापि, ॲस्पिरिनची ॲलर्जी असल्यास ते घेऊ नये.

३. नायट्रोग्लिसरीन घ्या : जर तुम्हाला वाटत असेल की तुम्हाला हृदयविकाराचा झटका आला आहे आणि तुमच्या डॉक्टरांनी नायट्रोग्लिसरीन लिहून दिले असेल, तर लगेच नायट्रोग्लिसरीन घ्या.

४. जर पीडित बेशुद्ध असेल तर CPR द्या : जर पीडित व्यक्ती बेशुद्ध झाली असेल, श्वास घेण्यास असमर्थ असेल किंवा नाडी सापडत नसेल तर त्याला सीपीआर द्यावा.

५. AED चा वापर : AED उपलब्ध असल्यास, ते उपकरणाच्या सूचनांचे अनुसरण करून वापरावे.

## मुलांना होणार नाही डिहायड्रेशन, जेवणात करा या गोष्टींचा समावेश


Image Credited - Insider

उन्हाळा आणि पावसाळ्यात मुलांच्या आरोग्यावर अधिक परिणाम होतो. बदलत्या हवामानात मुले वारंवार आजारी पडत असल्याने डिहायड्रेशनची समस्याही दिसून येत आहे. त्याचबरोबर खेळात अनेक वेळा मुले पिण्याच्या पाण्याचीही काळजी घेत नाहीत. अशा परिस्थितीत मुलांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आणि त्यांना डिहायड्रेशनपासून वाचवण्यासाठी त्यांच्या खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. मुबलक प्रमाणात पाणी पिण्यासोबतच काही पदार्थांचा आहारात समावेश करून मुलांना डिहायड्रेशनपासून वाचवता येते.

**मुलांच्या आहारात करा ताक किंवा लस्सीचा समावेश**

उन्हाळ्यात लहान मुले आणि प्रौढांनाही ताक आणि लस्सी प्यायला आवडते. मुलांच्या आहारात ताक समाविष्ट करू शकता. यामुळे मुले डिहायड्रेशनपासून तर वाचतीलच शिवाय त्यांना पोषक तत्त्वेही मिळतील. मात्र दही किंवा ताक हे घरगुतीच असावे.

**तुम्हाला डिहायड्रेशनपासून वाचवेल नारळ पाणी**

नारळाच्या पाण्याची चव अशी आहे की मुलेही ते पिण्यास नकार देत नाहीत. नारळ पाणी अनेक पौष्टिक मूल्यांनी परिपूर्ण आहे. हे प्यायल्याने मुलांचे शरीर हायड्रेटेड राहते आणि एनर्जीही मिळते.

**मुलाला खायला द्या ही फळे**

मुलाला डिहायड्रेशनपासून वाचवायचे असेल, तर त्याला सफरचंद, संत्री, किवी, काकडी, डाळिंब ही फळे खायला द्या. ही फळे केवळ शरीराला हायड्रेट ठेवत नाहीत, तर रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवतात, ज्यामुळे मुले आजारी पडण्याची शक्यता कमी असते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासोबतच लिंबू पाणी तुम्हाला ठेवते हायड्रेट**

मुलांना अनेकदा साधे पाणी पुन्हा पुन्हा प्यावेसे वाटत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही त्यांना कमी साखरेचे बनवलेले लिंबूपाणी देऊ शकता. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी असते, ज्यामुळे तुमच्या मुलांची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते आणि शरीरातील पाण्याची कमतरता देखील पूर्ण होते.

**भाज्या नाही तर भाजीचा रस**

अनेकदा मुले भाज्या खाण्यास नाखूष असतात, अशा परिस्थितीत तुम्ही त्यांना भाज्यांचा रस बनवून देऊ शकता. रसात पुदिना आणि इतर औषधी वनस्पती घालून चव वाढवा. मुले आनंदाने रस पितील. याशिवाय भाज्या कोशिंबीर स्वरूपातही देता येतात.

## रात्री दही खाणे फायदेशीर आहे का? जाणून घ्या काय म्हणतात तज्ज्ञ


Image Credited - India.com

दही कोणत्याही गोष्टीसोबत खाल्ल्यास त्याची चव वाढते. दही जेवणाची चव तर वाढवतेच, पण पौष्टिक देखील बनवते. विशेषतः उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी दही खाण्याचा सल्ला दिला जातो. आरोग्य तज्ञ लोकांना त्यांच्या आहारात दही समाविष्ट करण्याचा सल्ला देतात.

पण बहुतेक लोकांना रात्री झोपण्यापूर्वी दही खाण्याची सवय असते. अर्थात दह्यामध्ये अनेक पोषक घटक आढळतात, जे आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. पण रात्रीच्या जेवणानंतर दही खाण्याची खरोखरच चांगली सवय आहे का? येथे आम्ही तुम्हाला याबद्दल सांगणार आहोत.

**रात्री दही खाणे फायदेशीर आहे का?**

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, रात्री दही खाण्याने कोणतेही नुकसान होत नाही. पण जर एखाद्या व्यक्तीला पचनाशी संबंधित समस्या असतील, तर रात्री दही खाल्ल्याने समस्या उद्भवू शकतात. याचे कारण असे की हे चरबी आणि प्रथिने समृद्ध असलेले दुग्धजन्य पदार्थ आहे, जे रात्री पचणे कठीण होऊ शकते. रात्री चयापचय हळूहळू कार्य करते. या कारणामुळे आपली पचनसंस्था मंद गतीने काम करते.

**कफ दोष वाढू शकतो**


आयुर्वेदानुसार, दही शरीरातील कफ दोष वाढवू शकते. रात्रीच्या वेळी शरीरात कफ वाढण्याची शक्यता असते. यामुळे, अनुनासिक परिच्छेदांमध्ये श्लेष्मा विकसित होण्याचा धोका आहे. तथापि, वेगवेगळ्या मानवांवर त्याचा प्रभाव देखील भिन्न असू शकतो. दमा, खोकला आणि सर्दीची समस्या असणाऱ्यांनी रात्री दही खाणे टाळावे.

**दही खाण्याची योग्य वेळ कोणती?**

रात्री दही खाण्याऐवजी सकाळी किंवा दुपारच्या जेवणासोबत खा. दिवसाच्या या वेळी दही पचण्यास सोपे असते. तुम्ही सकाळी नाश्त्यातही ते खाऊ शकता. दह्यासोबत केळी किंवा आंबाही खाऊ शकता.

## बिर्याणीचे रंग विषापेक्षा नाहीत कमी, असे बनवा नैसर्गिक आणि आरोग्यदायी खाद्य रंग

२९ जून रोजी बकरीद सण साजरा केला जाणार आहे. यानिमित्त विविध स्वादिष्ट पदार्थ बनवले जातात. या पदार्थांमध्ये बिर्याणीचाही समावेश असतो. यानिमित्ताने स्वादिष्ट बिर्याणीही तयार केली जाते. बिर्याणीला चवदार आणि आकर्षक बनवण्यासाठी लोक कृत्रिम खाद्य रंगांचाही वापर करतात. या केमिकलयुक्त रंगांमुळे तुमचे जेवण आकर्षक दिसत असले, तरी ते तुमच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.


Image Credited - HerZindagi

आर्टिफिशियल फूड कलर्समुळे तुमच्या आरोग्याला काय हानी पोहोचू शकते, यासोबतच बिर्याणीला नैसर्गिक रंग कसा बनवता येईल, ते येथे जाणून घेऊया. एका अहवालानुसार, या खाद्य रंगांमध्ये बेंझिन आढळते. त्याला कार्सिनोजेन असेही म्हणतात. याशिवाय त्यामध्ये इतरही अनेक घातक रसायने असतात. त्यामुळे कर्करोग किंवा ट्यूमर देखील होऊ शकतो. या रंगांमुळे ॲलर्जीही होऊ शकते. या रंगांमुळे दमा आणि अर्टिकेरियाचा त्रास होऊ शकतो. या रंगांमुळे अटेन्शन डेफिसिट हायपरएक्टिव्हिटी डिसऑर्डरची समस्या देखील होऊ शकते. जरी याला संपूर्णपणे पुष्टी मिळाली नाही. हे रंग तुमच्या रोगप्रतिकारक शक्तीवरही वाईट परिणाम करू शकतात.

जर तुम्ही कृत्रिम खाद्य रंग वापरू शकत नसाल, तर नैसर्गिक रंग वापरता आले तर काय? हे नैसर्गिक रंग तुमच्या जेवणाला आकर्षक बनवण्याचे कामही करतील. बिर्याणीला पिवळा रंग देण्यासाठी तुम्ही केशर वापरू शकता. हा रंग तयार करण्यासाठी पॅनमध्ये एक चतुर्थांश कप पाणी उकळवा. त्यात १/४ टीस्पून हळद घाला. त्यात २ ते ३ केशराचे धागे टाका. हे पाणी ५ मिनिटे उकळा. आता ते गॅसवरून काढा. त्याला थंड होऊ द्या. आता हा रंग तुम्ही बिर्याणीसाठी वापरू शकता.

केशरी रंग करण्यासाठी तुम्ही गाजर पावडर आणि केशर धागा वापरू शकता. यासाठी एका पातेल्यात एक कप पाणी ठेवा. त्यात केशराचे दोन धागे टाका. त्यात दोन चमचे गाजर पावडर घाला. आता सर्व वस्तू मंद आचेवर शिजवा. हे मिश्रण थंड करा. हे मिश्रण गाळून आणि थंड केल्यानंतर तुम्ही ते बिर्याणीसाठी वापरू शकता.

## 'यावेळी' पपई खाणं आरोग्यासाठी फायदेशीर

दिवसाची सुरुवात आरोग्यदायी पद्धतीने करावी, ज्यामुळे तुम्ही दिवसभर उत्साही राहाल आणि तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या येणार नाही. चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई. पपई शरीरासाठी गरम असल्याने वातावरणात गारवा असताना हे खाणे हितकारी आहे. जर रिकाम्या पोटी पपई खाल्ल्यास तुम्ही दिवसभर ऊर्जावान तर राहालच, शिवाय तुम्ही अनेक आजारांच्या धोक्यापासून स्वतःला दूर ठेवू शकता. रिकाम्या पोटी पपई खाण्याचे काय फायदे आहेत ते जाणून घेऊया.

**सकाळी रिकाम्या पोटी पपई खाण्याचे फायदे**

१. पपई व्हिटॅमिन सी आणि आवश्यक अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे जे त्वचेचेसाठी उपयुक्त ठरू शकते. पपईमध्ये असलेले गुणधर्म त्वचेच्या पेशी दुरुस्त करण्यात आणि त्वचेचे संरक्षण करण्यास मदत करतात.

२. कोलेस्टेरॉल तुमच्या शरीराला विशेषतः तुमच्या हृदयाला अनेक प्रकारे नुकसान करू शकते. त्यामुळे कोलेस्टेरॉलचे प्रमाण नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे. पपईमध्ये असलेले फायबर कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. याव्यतिरिक्त, पपईमध्ये असलेले पोटॅशियम उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते यामुळेही हृदयाला होणारी हानी कमी होते.

३. पपईमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. हे फळ खाल्ल्याने शरीराला संसर्ग आणि इतर आजारांपासून सुरक्षित ठेवता येते.

४. पपई वजन कमी करण्यास मदत करू शकते. या फळामध्ये कॅलरीजचे प्रमाण खूपच कमी असते, तर पपईमध्ये भरपूर फायबर असते, ज्यामुळे भूक नियंत्रित ठेवण्यास मदत करते आणि दीर्घकाळ भूकेवर नियंत्रण ठेवते. त्यामुळे, जर तुम्ही वजन कमी करण्याच्या प्रयत्न करत असाल, तर तुमच्या आहारात पपईचा नक्कीच समावेश करा.

५. पपई पचनप्रक्रियेत मदत करते. यामध्ये असलेले आहारातील फायबर्स अँटिऑक्सिडेंट चयापचय वाढवण्यास आणि अन्न पचण्यास मदत करतात. हे आतड्यांसंबंधी समस्यांपासून आराम मिळवण्यास मदत करते.

६. मधुमेहाच्या रुग्णांना सकाळी पपई खाल्ल्याने फायदा होतो. पपईमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि साखरेचे प्रमाण कमी असते. फायबरमुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहण्यास मदत होते आणि शरीरातील ग्लुकोज नियंत्रणात राहते.

७. पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

## मॉर्निंग वॉकमध्ये पावसामुळे अडथळा येतोय 'या' उपायांचा करा अवलंब



पावसाळा नुकताच सुरू झाला असून त्याने दमदार हजेरी लावली आहे. अनेकदा पावसामुळे मॉर्निंग वॉककरता घराबाहेर पडता येत नाही. पावसाळ्यात आरोग्याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे. याकरता नियमित मॉर्निंग वॉक करणे गरजेचे आहे. यामुळे आरोग्य चांगले राहते तसेच अनेक आजार दूर होण्यास मदत होते. शरीराच्या हालचालीकरता चालणे हा अतिशय सोपा मार्ग आहे. निरोगी राहण्यासाठी लोक मॉर्निंग वॉकसाठी जातात किंवा काही लोक संध्याकाळी वॉकला जातात. मात्र पावसाळ्यात अनेकदा आपल्याला चालण्यासाठी बाहेर पडता येत नाही अशा वेळी घरातल्या घरात देखील व्यायाम केला जाऊ शकतो. घरात व्यायाम करण्याकरता काय उपाय करावेत जाणून घेऊयात.

१ . तुम्ही रोजचे तुमचे काम करत असताना देखील तुमचा वॉक होऊ शकतो. त्यासाठी घरातच टिव्ही शो पाहताना , गाणे ऐकत किंवा एखाद्या व्यक्तीशी फोनवर बोलत तुम्ही वॉक करू शकता.

२. तुम्ही काहीतरी वेगळे करण्याचा विचार करत असाल तर घरातच गाणे लावून तुम्ही झुंबा (नींलर) करू शकता. तसेच स्किपिंग, जंपिंग जॅक आणि हॉपिंग यांसारख्या ॲक्टिवीटीज देखील तुम्हाला घरातल्या घरात करता येऊ शकतात.

३. केवळ घरातल्या घरातच व्यायाम न करता तुम्ही तुमच्या घराजवळ असणाऱ्या बागेत , राहत्या अपार्टमेंटच्या खाली या ठिकाणीही चालण्यासाठी जाऊ शकता. यामुळे पावसाळ्यात देखील तुमचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल.

४. घरात ट्रेडमिल असेल तर त्याचा वापर तुम्ही चालण्याकरता करू शकता.

५. तुमच्या घरातील लोकांसोबत किंवा मित्र-मैत्रिणींसोबत तुम्ही बॅडमिंटन तसेच टेबल टेनिस असे शरीरास चालना देणारे गेम्स खेळू शकता.

६. रोजच्या दैनंदिनीत लिफ्टच्या वापर करणे टाळा. शक्यतो कोठेही बाहेर जाताना चालत जा. व्यायामाकरता पायऱ्यांचा वापर करा. जेणेकरून शरीराची हालचाल होईल आणि कोणताच आजार बळावणार नाही.

७. मॉर्निंग वॉक करताना थंड पाणी पिणे टाळा. चालताना जर तहान लागत असेल तर एक कोमट पाण्याची बाटलीसोबत ठेवा. कोमट पाणी प्यायल्यानं पचन क्रिया चांगली होते.

८. नियमित चालणे रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलचे चांगले नियंत्रणात राहते. दिवसभर थोडे चालणे स्नायूंना सक्रिय बनवते. त्यामुळे ऋतू कोणताही असू निरोगी शरीराकरीता मॉर्निंग वॉक घेणे खूप गरजेचे आहे.

## पिवळ्या दातांसह या ५ समस्या दूर करण्यासाठी प्रभावी खोबरेल तेल, रात्रभरात दिसून येतो परिणाम

नारळ तेल म्हणजेच खोबरेल तेल त्वचा, केस आणि आरोग्याची उत्तम काळजी घेऊ शकते. नारळ तेल, सर्वोत्तम मॉइश्र्चरायझिंग एजंट मानले जाते, अनेक प्रकारे रूटीनमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. विशेष म्हणजे त्याचे नुकसानही कमी आहे. त्यात असे अनेक पोषक घटक आढळतात जे आपल्या त्वचेला आतून आणि बाहेरून पोषण देतात. रात्री लावल्यास त्याचा प्रभाव दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत दिसून येतो. आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की खोबरेल तेल ७ समस्या दूर करण्यासाठी कशाप्रकारे प्रभावी आहे.

दात पॉलिश : या तेलात लॉरिक ॲसिड असते, जे अँटी-मायक्रोबियल गुणधर्मांनी समृद्ध असते. हे बॅक्टेरिया नष्ट करते आणि दात किडण्यास प्रतिबंध करते. हिरड्यांची सूज आणि दातांची संवेदनशीलता कमी करण्यासोबतच हे तेल दात पांढरे करण्यासाठीही उपयुक्त आहे. आठवड्यातून दोन ते तीन वेळा दातांना मसाज करा.

केस गळणे होईल कमी : जर तुमचे केस वेगाने गळत असतील, तर त्यावर खोबरेल तेलाची मसाज सुरू करा. केसांना आठवड्यातून दोन ते तीन वेळा खोबरेल तेल लावा आणि नंतर शॅम्पू-कंडिशनर वापरा. असे केल्याने केस मजबूत तर होतीलच पण चमकदारही होतील. या तेलात आवश्यक तेलाचे काही थेंब मिसळा आणि लावा आणि फरक पहा.

नखांसाठी फायदेशीर : नारळाचे तेल नखे आणि त्याच्या सभोवतालची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी देखील फायदेशीर आहे. रात्री झोपण्यापूर्वी नखांवर आणि त्याच्या आजूबाजूच्या त्वचेला खोबरेल तेल लावून झोपा.

डोळ्याच्या पापण्या : डोळ्यांचे आणि चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याचे काम पापण्या करतात. जर तुम्हाला त्यांना मजबूत आणि दाट बनवायचे असेल तर झोपण्यापूर्वी त्यावर शेल तेल लावा. ते डोळ्यात जाऊ नये हे लक्षात ठेवा.

भुवया : भुवयांच्या हल्क केसांमुळे कधी कधी लूक खराब दिसतो. भुवयांचे केस काळे किंवा दाट होण्यासाठी त्यांच्यावर खोबरेल तेल लावण्याची सवय लावा. रात्री झोपण्यापूर्वी लावणे चांगले.

ओठांसाठी : उन्हाळ्यातही ओठांची त्वचा कोरडी पडू लागते. मॉइश्र्चरायझेशन किंवा मॉइश्र्चर नसल्यामुळे ओठ तडकायला लागतात आणि त्यात खूप वेदना होतात. ओठांची समस्या असल्यास दिवसातून किमान दोनदा तेल लावावे. याशिवाय नियमितपणे ओठांवर तेल लावून झोपू शकता.

